**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०३/२०१७** **दिनांक १०/०१/२०१७** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. उत्तम महाडकर,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. वैभव राजेमहाडिक,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२७९१९९८ | ९४०३९८८१४३ | ९४२०६७३२६७ |


| **मागील हवामान सारांश दि. ०६/०१/२०१७ ते १०/०१/२०१७** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (११/०१/२०१७ सकाळी ८:३० पासून १५/०१/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | ११/०१ | १२/१२ | १३/०१ | १४/०१ | १५/०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २८ | २८ | २९ | २९ | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | १५ | १४ | १३ | १२ | १२ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५५ | ४३ | ५१ | ५५ | ६७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | २६ | ३० | २७ | २८ | २९ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००६ | ००६ | ००५ | ००५ | ००५ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक ११ ते ११ जानेवारी २०१७ पर्यंम अवकाश स्वच्छ सुर्यप्रकाशित राहिल. दिनांक ११ ते १५ जानेवारी २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ५ ते ६ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **चिकू** | वाढीची अवस्था | • चिकू बागेतील गवताच्य नियंत्रणासाठी गवताची कापणी विळयाच्या/गवत कापणी यंत्राच्या सहाय्याने करावी किंवा ग्लायफोसेट तणनाशक ३ ते ४ मिली प्रति लिटर पायात मिसळून त्याची फवारणी गवतावर करावी.<br>**टिप –** तणनाशकाची फवारणी केलेल्या बागेत जनावरे चरवीण्यासाठी सोडू नये. |
| **नारळ/ सुपारी** | वाढीची अवस्था | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस. २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला** | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांच्या रोपवाटीकेवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलॅथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वांगी व मिरची यांची रोपे ५ ते ६ आठवडयाची झाली असल्यास त्यांची पूर्न:लागवड करावी. पूर्न:लागवड करतेवेळी रोपे डायमेथोएट १ मिली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावीत व प्रत्येक ठिकाणी एकच रोप लावावेत. लागवड सरी वरंब्यावर करावी (६०ग ६०सें. मी.). लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **कलिंगड लागवड** | – | • कलिंगडाची लागवड करण्यासाठी जमिन नांगरून कुळवून लागवडीसाठी तयार करावी. लागवडीसाठी ४ मीटर अंतरावर पाट किंवा सऱ्या काढाव्यात. पाटाच्या दोन्ही बाजूस ९० सें.मी. अंतरावर ३० x ३० x ३० सें.मी. आकाराचे खड्डे करून त्यात १ ते १.५ किलो चांगले कुजलेले शेणखत व १० ग्रॅम कार्बारील (१०टक्के) पावडर मिसळून खड्डा भरून घ्यावा. प्रत्येक खड्डयात ३–४ बिया एकमेकापासून ४–५ सें.मी. अंतरावर व २ ते २.५ सें.मी. खोलीवर लावाव्यात रूजवा झाल्यानंतर १५ दिवसांनी रोपांची विरळणी करून प्रत्येक ठिकाणी २ चांगली जोमदार रोपे ठेवावीत. या पिकाला प्रती हेक्टरी १५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश याची मात्रा द्यावी. स्फुरद आणि पालाश याची संपुर्ण मात्रा व नत्राची १/३ मात्रा पेरणीच्या वेळेस द्यावी. उर्वरीत नत्राची मात्रा समप्रमाणात विभागून १ व २ महिन्यांनी लागवडीनंतर द्यावी.<br>• कलिंगड पिकामध्ये मर (वेली संपूर्ण सुकून जातात) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वेलीच्या बुंध्याशी ओतावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे /शेळया** | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्शीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरॅग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी.<br>• रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे व पक्ष्यांचे थंडीपासून योग्य ते संरक्षण करावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |